रशेल कार्सन कोण होती?



लेखिका : सारा फॅबिनी
रेखाचित्रं : देदे पुत्रा

रशेल कार्सन कोण होती?



रशेल कार्सन कोण होती?

लेखिका : सारा फॅबिनी
रेखाचित्रं : देदे पुत्रा

अनुक्रमणिका

रशेल कार्सन कोण होती?



लहानपणी, रशेल कार्सनला शेतावरच्या घराच्या व्हरांड्यात आईचा मोठा शंख कानाला लावून बसायला फार आवडायचं.

शंख कानाला लावून, रशेल घराभोवतीचं शेत आणि जंगलं तन्मयतेनं पहायची. तिला शेतातली आणि जंगलातली झाडंझुडपं, प्राणी आणि अगदी इवलाले किडे सुध्दा प्रिय होते. मात्र शंखातून ऐकू येणा-या समुद्राच्या गाजेच्या आवाजानं तिला समुद्राची स्वप्नं पडायला लागायची. समुद्रकिना-यावर जाऊन उभं रहाणं तिला सर्वात जास्त प्रिय होतं. पावलांना होणारा लाटांचा स्पर्श तिला हवाहवासा वाटायचा.

रशेल लाजाळू होती पण त्याबरोबरच ती दृढनिश्चयी होती. तिला केवळ समुद्राची स्वप्नं पडत होती असं नाही तर लेखिका होण्याचंही तिचं स्वप्न होतं. आपण कष्ट केले आणि स्वप्नं कायम उराशी कवटाळली तर कधीतरी ती स्वप्नं पूर्ण होतील हे तिला ठाऊक होतं. आणि नेमकं तसंच घडतं. रशेलला आयुष्यात अनेक संकटांचा सामना करावा लागला तरी तिची कष्ट करण्याची वृत्ती आणि निश्चय यांच्या जोरावर ती लेखिका झाली – एक अशी लेखिका, जिला समुद्र, समुद्रकिनारा आणि तिथे वस्तीला असणारे सर्व जीवजंतू यांच्याबद्दल सगळं काही माहिती होतं.



आपल्या पुस्तकात, रशेलनं निसर्गातल्या वैज्ञानिक संकल्पना सर्वसामान्यांना समजतील अशा सोप्या भाषेत उलगडून दाखवल्या. सर्व जीवित जगाचं एकमेकांशी नातं आहे हे देखील तिनं दाखवून दिलं. या ग्रहावर प्रत्येक झाड, प्रत्येक कीटक, प्रत्येक प्राणी आपले सहनिवासी आहेत आणि तो ग्रह जपणं किती महत्वाचं आहे हे सगळ्यांना समजावं असा रशेलचा हेतू होता.

आपल्या आईवडिलांच्या घराच्या व्हरांड्यात ती शंख कानाला लावून बसलेली असताना, आपण ज्या जगात रहातो आहोत, त्या जगाला आकार देण्याचं काम तिचं स्वप्न करणार आहे याची तिला अजिबात कल्पना नव्हती.

प्रकरण १


मोठे आणि छोटे जीव



रशेल कार्सनचा जन्म स्प्रिंगडेल, पेनसिल्व्हेनिया या ठिकाणी २७ मे १९०७ रोजी झाला. तिची आई मारिया मॅक्लिआॅन ही प्रेसबायटेरियन पंथाच्या धर्मगुरुची मुलगी होती. ती शाळेत शिकवायची आणि मुलांसाठी पियानोचे खासगी वर्गही घ्यायची.

रॉबर्ट कार्सनशी लग्न ठरल्यावर मारियाला आपली नोकरी सक्तीनं सोडावी लागली. पेनसिल्व्हेनियामध्ये तेव्हा विवाहित बायकांना शाळेत शिकवायची परवानगी नव्हती.

रशेलचे वडिल, रॉबर्ट, यांच्याकडे पिटसबर्गच्या दक्षिणेला सुमारे पंधरा मैलावर असलेल्या आणि अलेघेनी नदीच्या तीरावर वसलेल्या स्प्रिंगडेल या गावाजवळ पासष्ट एकर शेतजमीन होती. त्यांच्या मालमत्तेत दोन मजली टुमदार घर, तबेला, नोकरांची रहाण्याची घरं, कोंबड्यांची खुराडी आणि एक दुसरी हवेली इतक्या गोष्टी समाविष्ट होत्या.





कार्सन कुटुंबाकडे काही डुकरं, घोडे, गायी आणि कोंबड्या होत्या. रशेलचा जन्म झाला तेव्हा तिला मारियान नावाची बहीण आणि रॉबर्ट ज्युनिअर हा भाऊ होता.



रशेल आणि तिचा कुत्रा, कँडी हे दोघं घराभोवतीचा प्रदेश धुंडाळण्यात बराच वेळ घालवायचे. भोवतालची शेतं आणि जंगलं यात विविध प्रकारची असंख्य झाडंझुडपं, प्राणी आणि कीटक होते आणि रशेलला ते सगळंच अद्‌भुत वाटायचं. रशेलची भावंडं तिच्यापेक्षा बरीच मोठी होती, त्यामुळे रशेल ब-याचवेळा एकटीच असायची. अर्थात तिची त्याबद्दल तक्रार नव्हती, तिला सगळेच जीवजंतू आपले मित्र वाटायचे. घरटं बांधत असणारे पक्षी, गवतावर बागडणारी फुलपाखरं आणि झ-यांमध्ये संचार करणारे मासे हे सगळं न्याहाळण्यात तिचा दिवस निघून जायचा. झ-यांमधून वाहणारं खळाळतं पाणी तिला आवडत असलं तरी, समुद्र पहाणं हे रशेलचं सर्वात मोठं स्वप्न होतं.

रशेलच्या आईकडे एक मोठा शंख होता आणि रशेलला तो कानापाशी धरुन ऐकायला फार आवडायचा. किना-यावर आदळणा-या लाटांचा नाद आपल्याला ऐकू आल्यासारखंच तिला वाटायचं आणि ती स्वत:चं समाधान करुन घ्यायची.

रशेलची आई ही उत्तम पक्षी-निरीक्षक होती. मुलांनी निसर्गाचा अभ्यास करणं महत्वाचं आहे असं तिलाही वाटायचं.

जग हे सगळ्यांचं आहे आणि सगळ्या जिवांबरोबर मिळूनमिसळून रहायला हवं असं आईनं रशेलला शिकवलं. छोट्यामोठ्या कीटकांना सुध्दा तिची आई मारुन न टाकता अलगद घराबाहेर सोडून यायची. असं दृश्य रशेलला नेहमी दिसायचं.

रशेल आणि तिची आई या दोघीजणी शेतात आणि जंगलात दूरवर फिरायला जात असत. तिथे दिसणा-या गोष्टींबद्दल रशेल जे प्रश्न विचारायची, त्या प्रश्नांची आई उत्तरं द्यायची. मात्र तिला जर रशेलच्या विज्ञानातल्या किंवा निसर्गविषयक प्रश्नाचं उत्तर देता आलं नाही तर, ती ते उत्तर पुस्तकात कसं शोधायचं ते रशेलला दाखवायची.



रशेलनं आपल्या कुटुंबाच्या मालमत्तेवर येणा-या सशांना बंदुकीच्या गोळ्या झाडून मारण्यापासून तिच्या भावाला परावृत्त करायला सुरुवात केली, ते ससे तिला बिॲट्रिक्स पॉटर हे तिच्या आईनं वाचून दाखवलेल्या पुस्तकांमधल्या सशांची आठवण करुन द्यायचे.

रशेलनं १९१३च्या हिवाळ्यात शाळेत जायला सुरुवात केली. तिला शाळा आणि शिकणं प्रिय होतं, पण तिला बरेच दिवस घरातच बसावं लागायचं. बाहर बर्फ पडून जर खूपच थंडी असेल, तर रशेल घरी थांबायची आणि आई तिला शिकवायची. वर्गातली इतर मुलं जर आजारी असतील, तर रशेल आजारी पडण्याचा धोका तिच्या आईला घ्यायचा नव्हता. अनेक तास बुडले तरी रशेल वर्गात झळकणारी मुलगी होती.

सौ कार्सन या उत्कृष्ट शिक्षिका होत्या; त्या शाळेत शिकवत होत्या हे विसरुन कसं चाललं असतं?

प्रकरण दोन

एका लेखिकेचा जन्म



द विंड इन द विलोज आणि पीटर रॅबिट ही रशेलची आवडती पुस्तकं होती. त्यात प्राण्यांच्या आणि प्राणी निसर्गात कसे रहातात याबद्दलच्या कथा होत्या. रशेलला वाचायला खूप आवडायचं आणि वडिल शहरात जायला निघाल्यावर ती त्यांच्याबरोबर जायचा हट्ट करायची, तिला तिथे ग्रंथालयात जाता यायचं. लवकरच तिनं प्राणी आणि निसर्गातल्या सुरस अनुभवांवर कथा लिहायला सुरुवात केली.

दर महिन्याला सेंट निकोलस नावाचं एक मासिक रशेलसाठी पोस्टानं यायचं. मुलांसाठी असलेल्या त्या मासिकात भरपूर कथा, कविता असायच्या.

मार्क ट्वेनपासून लुईसा मे अल्कॉटपर्यंत नामवंत लेखक त्यात लिहायचे आणि नॉर्मन रॉकवेलसारख्या प्रसिध्द चित्रकारांची रेखाटनं त्यात असायची. त्या मासिकातला सेंट निकोलस लीग नावाचा विभाग रशेलचा आवडता होता.



त्या विभागात मुलांनी लिहिलेले लेख, कथा आणि चित्रं प्रायोजकांमार्फत प्रकाशित व्हायची. विजेत्यांना गोल्ड बॅजेस आणि रनर्स अपना सिल्व्हर बॅजेस दिले जायचे.

गोल्ड आणि सिल्व्हर बॅजेस मिळालेली मुलं प्रतिष्ठित सदस्य असायची. त्यांना रोख रकमेची पारितोषिकं मिळायची.

रशेल दहा वर्षांची असताना, तिनं आपली एक कथा सेंट निकोलस मासिकाकडे पाठवायची असं ठरवलं. आपलं लिखाण पारितोषिक मिळवण्याइतकं चांगलं आहे असं तिला वाटत होतं. आपण कशाबद्दल लिहावं हे मात्र तिला कळत नव्हतं. पण तिला आपल्या भावामुळे एक कल्पना सुचली. तेव्हा तिचा भाऊ, रॉबर्ट या पहिल्या महायुध्दात अमेरिकन सैन्यात लढायला गेला होता. त्यानं पाठवलेल्या एका पत्रात त्यानं एका कॅनेडियन पायलटबद्दल लिहिलं होतं. त्या कॅनेडियन पायलटनं एक पंखा तुटलेल्या अवस्थेतही विमान चालवलं होतं.



रशेलनं परिश्रम घेऊन ती कथा लिहिली आणि अखेरीस धीर करुन मासिकाला पाठवली. मग ती त्यांच्याकडून अभिप्राय येण्याची वाट पहात बसली. १९१८ मध्ये सप्टेंबर महिन्यातल्या एका सकाळी, रशेलला त्या मासिकाचा ताजा अंक मिळाला. सेंट निकोलस विभागात तिची कथा – अ बॅटल इन द क्लाऊडस् - चक्क छापून आली होती. कथेच्या शीर्षकाखाली तिचं नाव होतं आणि त्याखाली छापलं होतं – सिल्व्हर बॅज.



सिल्व्हर बॅज पारितोषिक मिळणं हे रशेलसाठी आनंदाचं होतं. त्यातून तिला पुढच्या कथा लिहायला प्रोत्साहन मिळालं. त्यातल्या बहुतेक कथा पहिल्या महायुध्दावर आधारित होत्या. १९१९ च्या फेब्रुवारी महिन्यात रशेलला तिच्या एका कथेसाठी मासिकाकडून गोल्ड बॅज मिळाला. सिल्व्हर आणि गोल्ड बॅज असं दोन्ही मिळाल्यामुळे रशेलला रोख रकमेचं पारतोषिकही मिळालं. ती रक्कम होती – दहा डॉलर्स, त्याकाळी ही मोठी रक्कम होती. आपण कदाचित खरोखरच एक मोठी लेखिका होऊ असं रशेलला तेव्हा वाटायला लागलं.

आणि तो दिवस रशेलच्या अपेक्षेपेक्षा खूप लवकर उगवला. सेंट निकोलस मासिक आपल्याला का आवडतं? यावर तिनं आठवीत असताना एक निबंध लिहिला. तो निबंध जाहिरातीसाठी सेंट निकोलस मासिकानं विकत घेतला! रशेलला त्यांनी एका शब्दाला एक पेनी इतकं मानधन देऊ केलं, म्हणजे साधारणपणे तीन डॉलर्स. हे पैसे म्हणजे बक्षीस नसून मानधन होतं. नंतर रशेल नेहमी सांगायची, ती वयाच्या अकराव्या वर्षी व्यावसायिक लेखिका झाली.

तिनं ज्या पाकिटातून मानधनाचा चेक आला त्या पाकिटावर पहिली कमाई असं लिहिलं आणि ते पाकिट आयुष्यभर जपून ठेवलं.




हायस्कूलमध्ये गेल्यावरही रशेलनं कथा लिहिणं सुरु ठेवलं. चांगले गुण मिळावेत यासाठीही ती झडत होती, म्हणजे तिला कॉलेजमध्ये प्रवेश मिळाला असता. कॉलेजमध्ये जायचा रशेलनं निश्चय केला होता.

रशेलला एकटीनंच वेळ घालवणं आणि कोणीही आजूबाजूला नसताना शांतपणे लिहायला आवडायचं. ती एक कष्टाळू विद्यार्थिनी असल्यामुळे शिक्षकांना ती आपल्या वर्गात असलेली आवडत असे. पण रशेल लाजाळू होती.



सेंट निकोलस मासिक



सेंट निकोलस मासिक ज्यांनी सुरु केलं ते डॉ जोसेया गिलबर्ट हॉलंड यांना मुलांसाठी उत्फुल्ल, उत्तम रीतीनं लिहिलेल्या कथा, कविता आणि लेख असलेलं मासिक सुरु करायचं होतं. मेरी मेपस डॉज ही लहान मुलांसाठी पुस्तकं लिहिणारी लेखिका त्यांनी मासिकाची संपादक म्हणून निवडली. त्या मासिकाचा एकूण कारभार तिच्याकडे होता. ती स्वत: एक लेखिका असल्यामुळे तिनं ते मासिक म्हणजे मुलांसाठी एक बागडण्याची जागा, जिथे त्यांची दुनिया असल्यानं त्यांना आनंद लाभेल असा दृष्टिकोन बाळगला होता. हे मासिक प्रथम १८७३ मध्ये प्रकाशित झालं आणि त्याचा शेवटचा अंक साधारण सत्तर वर्षांनंतर १९४० मध्ये प्रकाशित झाला.

या मासिकात रॉबर्ट लुईस स्टीव्हनसन, एमिली डिकनसन, लॉरा इनगॉल्स वाईल्डर यांच्यासारख्या नामांकित लेखकांचा समावेश होता. एफ स्कॉठ फिटझगेराल्ड, विल्यम फॉकनर, इ इ कमिंग्जसारख्या दिग्गज लेखकांच्या आणि कवींच्या लेखनाची सुरुवात या मासिकातून झाली.



मेरी मेपस डॉज




वर्गातल्या तिच्या काही मैत्रिणींना ती शिक्षकांची लाडकी आहे असं वाटायचं. रशेलनं मग मित्रमैत्रिणी जोडण्यासाठी शाळेच्या हॉकी टीममध्ये नाव नोंदवायचं ठरवलं.

तिला मैदानावर हॉकी खेळायला आवडत होतं आणि टीमचा एक भाग असणं आनंद देत होतं. ती बास्केटबॉलदेखील खेळायची आणि शाळेच्या फूटबॉल टीमच्या संचलनांमध्ये त्यांना प्रोत्साहन द्यायला सामील व्हायची.

रशेलला क्रीडा आणि नवीन मित्रमैत्रिणी आवडत असले तरी शाळेतला अभ्यास तिला सर्वात जास्त महत्वाचा वाटायचा. तिच्या वर्गमित्रांनी तिच्यावर एक कविता करुन शाळेच्या वार्षिक मासिकात तिच्या फोटोशेजारी चिकटवली होती.

रशेल माध्यान्हीच्या सूर्यासारखी आहे..
तिचं तळपणं कधीच थांबत नाही..
तिचा अभ्यास ती कधीच थांबवत नाही
जोपर्यंत सगळं अचूक होत नाही..!

रशेल हायस्कूलमध्ये सर्वात जास्त गुण मिळवून पास झाली. आता घर सोडून एका नवीन प्रवासासाठी निघण्याची वेळ झाली होती – कॉलेज.




प्रकरण ३

मार्गाची निवड



रशेलनं १९२५च्या हिवाळ्यात कॉलेज सुरु केलं, तो आक्रमक विसाव्या दशकाचा मधला काळ होता. स्प्रिंगडेलपासून पेनसिल्व्हेनिया कॉलेज ऑफ वूमेन अवघ्या १६ मैलांवर असलं तरी रशेलसाठी ते संपूर्ण वेगळंच जग होतं.

रशेलच्या आईला रशेलनं घराजवळच्या आणि मुलींसाठी असलेल्या कॉलेजमध्ये शिकावं असं वाटत होतं. पेनसिल्व्हेनिया कॉलेज आॉफ वूमेन हे पिटसवर्गमधलं कॉलेज तिच्यासाठी उत्तम आहे असं सौ कार्सन यांना वाटत होतं. रशेलला आईच्या पर्यायाबद्दल काहीच तक्रार नव्हती, पण तिथे पहिल्या वर्षाची फी एक हजार डॉलर्स होती. रशेलच्या शिक्षणावर खर्च करायला कार्सन कुटुंबाकडे तेवढे पैसे नव्हते. सुदैवानं कॉलेजच्या डीनना रशेलनं तिथे येऊन शिकावं असं वाटत होतं, त्यामुळे कॉलेजनं तिला शिष्यवृत्ती देऊ केली. त्यांनी रशेलच्या पुढच्या शिक्षणासाठी कर्ज मिळवून द्यायला मदत केली आणि तिला तिथे रहायला खोली, पुस्तकांचा खर्च असं सगळं मिळवून दिलं.



कॉलेज हे रशेलसाठी नवीन आव्हान होतं. तिच्या वर्गमैत्रिणींइतके तिच्याकडे पैसे नव्हते. इतरांसारखे उंची पोशाख नव्हते. त्यांच्याबरोबर सिनेमा पहायला किंवा शीतपेयं प्यायला जाणं तिला परवडत नव्हतं. (तिनं एक मॉडेल टी ही फोर्डची गाडीदेखील स्प्रिंगडेलला जायला उसनी घेतली होती!) आपल्या मैत्रिणी फिरायला बाहेर पडल्यावर त्यांच्याबरोबर न जाणं रशेलला अवघड गेलं असणार. पण आपण इथे शिकायला आलो आहोत आणि मजा करायला नव्हे.. हे ती स्वत:ला सतत सांगायची.

तिला लेखिका व्हायचं असल्यामुळे, रशेलनं इंग्रजी साहित्य आणि लेखनप्रक्रिया शिकायचं असं ठरवलं. तिच्या इंग्रजीच्या प्राध्यापिका मिस ग्रेस क्रॉफ होत्या. लवकरच त्या रशेलच्या लाडक्या शिक्षिका बनल्या. आणि रशेल लवकरच त्यांची लाडकी विद्यार्थिनी बनली. त्यांना रशेलची हुशारी पटकन दिसून आली आणि तिच्यातल्या बुध्दिमत्तेचा अंदाज आला.

मात्र इंग्रजी साहित्य एवढा एकच विषय शिकून चालणार नव्हतं. संगीतात काहीतरी शिकायला हवं असल्यामुळे रशेलनं व्हायोलिन शिकायला सुरुवात केली. पेनसिल्व्हेनिया कॉलेज आॉफ वूमेनमध्ये दुस-या वर्षी तिला विज्ञानातला एक विषय शिकावा लागणार होता.

तिनं जीवशास्त्र निवडलं, ज्यात झाडाझुडपांचा आणि प्राण्यांचा अभ्यास करायचा होता. तिला निसर्ग आवडत असला तरी रशेलला विज्ञानातला विषय शिकण्याची इच्छा नव्हती. शाळेतले विज्ञानाचे तास कंटाळवाणे होते.



मात्र, मिस मेरी स्किंकर या कॉलेजमध्ये जीवशास्त्र विषय शिकवणा-या शिक्षिकेमुळे विज्ञानविषय शिकण्याबाबत रशेलचं मत बदललं. स्किंकर यांना रशेलइतकीच निसर्गातल्या दुनियेची आवड आणि तळमळ होती. जवळपासच्या स्टेट पार्कसमध्ये अभ्यास-सहली जीवशास्त्राच्या शिक्षणात सामील आहेत असं कळल्यावर तर तिला पराकोटीचा आनंद झाला.



मेरी स्किंकर

एका सहलीत स्किंकर यांनी विद्यार्थिनींना छिन्नी हातोड्यानं दगडातले स्तर वेगळे करायला सांगितले. रशेलनं एका राखी रंगाच्या दगडावर घाव घातला. तो दगड जेव्हा फुटला, तेव्हा तिला एक आश्चर्यकारक गोष्ट दिसली! दगडाच्या आत खूप पूर्वी समुद्रात पोहणा-या माशाचा जीवाश्म होता. कॉलेजजवळचा तो भाग एकेकाळी समुद्राच्या तळाचा भाग होता असं स्किंकर यांनी त्यानंतर समजावून सांगितलं.




काही विद्यार्थिनींना विच्छेदन करणं आवडत नसलं तरी रशेलला त्याबद्दल कुतूहल होतं. तिला आवडणारे प्राणी कसे जगतात आणि वाढतात ते ती शिकत होती.

स्किंकर यांच्या जीवशास्त्र शिकवण्याच्या हातोटीमुळे रशेलनं विज्ञानातले अजून विषय शिकायचे ठरवले.



रशेलला प्राणी कसे हालचाल करतात, कसा श्वासोच्छवास करतात आणि कसं खातात हे शोधण्यातही खूप रस होता. वर्गातला अभ्यास करताना तिला प्राण्यांचं विच्छेदन करावं लागत असे. नाकतोडे, बेडूक आणि स्टारफिश उघडून विद्यार्थिनी तपासत असत.

तिला प्रामुख्यानं प्राणिशास्त्रात रस होता, ज्यात ती मुख्यत्वे प्राण्यांचा अभ्यास करु शकणार होती. आणि समुद्रात रहाणारे जलचर यांचा अभ्यास करण्याची रशेलला सर्वात जास्त आवड आणि उत्सुकता होती.



रशेलला इंग्रजी विषयात उत्तम गुण मिळाले होते आणि तिला मिस क्रॉफ यांच्याकडून शिकायला आवडत होतं. पण रशेलला विज्ञानाचे तास देखील प्रिय होते. तिला आता इंग्रजी शिकायचं का विज्ञान असा निर्णय घ्यावा लागणार होता. जर तिनं विज्ञान निवडलं तर इंग्रजीचे तास आणि लेखन हे ती गमावून असेल याची रशेलला काळजी वाटत होती. जर तिनं इंग्रजीवर लक्ष केंद्रित केलं असतं तर स्किंकर यांच्या निसर्गाच्या अद्‌भुत शिक्षणाला ती मुकेल असं तिला वाटत होतं.

एके रात्री आपल्या खोलीत बसलेली असताना, रशेलनं कवितांचं एक पुस्तक शेल्फमधून काढलं. बाहेर वादळी वारे वहात असताना तिनं लॉकस्ले हॉल ही कविता वाचायला सुरुवात केली. त्या कवितेतल्या मुख्य पात्राला एक अवघड निर्णय घ्यायचा असतो. त्या कवितेतली एक ओळ रशेलच्या आतपर्यंत पोचली आणि पलंगावर बसून बाहेरच्या वादळाचा आवाज ऐकत असताना तिनं पुढे काय याचा निर्णय घेतला. ती ओळ होती "For the mighty wind arises, roaring seaward, and I go."



स्त्रियांचं स्थान



१९२० मध्ये स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला. १९२५ पर्यंत तरुण मुलींनी कॉलेजला जाणं यात नावीन्य राहिलं नाही. १९२३ पर्यंत अमेरिकेतल्या त्यावर्षीच्या एकूण पदवीधारकांपैकी ३९ टक्के पदव्या स्त्रियांना मिळाल्या होत्या. अर्थात कॉलेजमध्ये जाऊन पदवी घेणं हे सर्रास सुरु झालं असलं तरी स्त्रियांना नोकरी मात्र मिळणं मुश्किल होतं. व्यावसायिक जगावर पुरुषांचं वर्चस्व होतं. स्त्रियांनी – अगदी पदवीधर स्त्रियांनी देखील – घरी उत्तम गृहिणी आणि आई अशी भूमिका निभवावी अशाच अपेक्षा केल्या जात होत्या.

ते शब्द रशेलच्या मनात घोळत राहिले. त्या ओळी तिनं अनेकवार वाचल्या. आपलं आयुष्य समुद्राशी सांधलं जाणार आहे याची रशेलला त्या क्षणी खात्री पटली. तिनं लेखिका होण्यापेक्षा संशोधिका होणं निवडायचं ठरवलं.

प्रकरण ४

भव्य स्वप्नं ..!




रशेलच्या वर्गमैत्रिणींना मात्र ती मोठी चूक करते आहे असं वाटत होतं. १९२० मध्ये एका तरुण मुलीला लेखिका म्हणून संधी मिळणं हे संशोधिका होण्यापेक्षा सोपं होतं. मात्र रशेलनं एखादी गोष्ट ठरवली तर ती तडीस नेल्याशिवाय ती रहात नसे.

रशेलनं त्यानंतर दोन वर्षं प्रचंड अभ्यास केला. तिनं शाळेच्या वर्तमानपत्रासाठीही काम केलं आणि हॉकी टीममध्येही ती होती.

पेनसिल्व्हेनिया कॉलेज ऑफ वूमेनमधल्या शेवटच्या वर्षाच्या शेवटच्या सत्रात रशेलनं जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठात पुढच्या पदवी शिक्षणासाठी अर्ज भरला. तिला विज्ञान या विषयाचंच शिक्षण घ्यायचं होतं. जॉन हॉपकिन्स हे एक प्रतिष्ठित विद्यापीठ होतं. त्यांनी रशेलच्या उत्तम गुणांकडे पाहून तिला प्रवेश तर दिलाच पण शिष्यवृत्तीदेखील दिली. रशेलनं आनंदाचा नि:श्वास टाकला. शिष्यवृत्ती मिळणं म्हणजे तिच्या कुटुंबियांना आता तिच्या शिक्षणासाठी खर्च करावा लागणार नव्हता.

रशेलला मॅसॅच्युसेटसमधल्या वुडस होल मध्ये मरिन बॉयॉलॉजिकल लॅबोरेटरीमध्येही उन्हाळी सुट्टी अभ्यास करायला येण्याचं आमंत्रण मिळालं. वुडस होल ही प्रसिध्द संशोधन संस्था होती. रशेलला तिथे विख्यात शास्त्रज्ञांना भेटण्याची आणि समुद्री जीवांचा अभ्यास करण्याची संधी मिळणार होती – तिनं पाहिलेली सगळीच स्वप्नं साकार होत होती.



वुड होल्समधली उन्हाळी सुट्टी ही रशेलच्या अपेक्षेपेक्षाही उत्तम होती. तिनं तोपर्यंत फक्त पुस्तकात वाचलेल्या समुद्राचं सौंदर्य आणि उर्जा तिला प्रथमच प्रत्यक्ष अनुभवता आली. वुडस होलमधल्या दीड महिन्यात, रशेलनं प्रयोगशाळेत काम केलं, समुद्रकिनारी भरपूर फिरली, तिनं अनेक मित्रमैत्रिणी जोडले. आपल्याला जे हवं होतं तेच हे आयुष्य आहे याची तिला खात्री पटली.



जॉन हॉपकिन्स या बाल्टिमोर, मेरीलँडमधल्या विद्यापीठातल्या हिवाळ्यात रशेल वॉशिंग्टन डीसीमधल्या युएस ब्युरो आॅफ फिशरीज मध्ये गेली. जीवशास्त्रज्ञ अशी नोकरी मिळण्यासाठी तिनं काय शिकायला हवं हे तिला माहिती करुन घ्यायचं होतं. त्यासाठी रशेलनं तिथले प्रभारी संचालक एल्मर हिगिन्स यांना भेटून चर्चा केली.




त्यांनी तिला ब्युरो आॅफ फिशरीजमध्ये कोणत्या प्रकारच्या नोक-या उपलब्ध आहेत ते समजावून सांगितलं. आपण तिथे कधीच महिला संशोधिकेला नोकरी दिलेली नाही हेदेखील त्यांनी सांगितलं.



यामुळे आपण संशोधिका म्हणून काम करायचा रशेलचा निश्चय आणखीनच दृढ झाला.

जॉन हॉपकिन्स विद्यापीठात रशेल जे शिकत होती तिथे खूप कमी स्त्रिया होत्या. आपलं काम करायलाही तिथे फारसा वेळ मिळत नसे. नाश्ता झाल्यानंतर लगेच वर्ग सुरु व्हायचे ते रात्रीच्या जेवणानंतरही चालायचे, त्यामुळे अभ्यास करायला वेळ उरत नसे.




अशी तीन अवघड वर्षं घालवल्यानंतर रशेलला मास्टर्सची पदवी १४ जून १९३२ रोजी मिळाली. दुर्दैवानं, देशात तेव्हा आर्थिक मंदी होती.

त्यामुळे असंख्य लोकांकडे रोजगार नव्हता. तेव्हा संशोधकांना देखील काम मिळणं अवघड झालं होतं, त्यात महिला संशोधिका म्हणून काम मिळणं तर जास्तच कठीण होतं.

कोणालाच महिला जीवशास्त्रज्ञ संशोधनासाठी नको होती. खूप शोधाशोध केल्यानंतर मेरीलँड विद्यापीठात रशेलला प्राध्यापिकेची नोकरी मिळाली. तिला खरं तर ते काम करण्यात फार रस नव्हता, त्या खडतर काळात नोकरी मिळाली हेच महत्वाचं होतं. आर्थिक मंदीमुळे हलाखीत दिवस काढणा-या आपल्या कुटुंबाला त्या नोकरीमुळे तिला मदत करता येऊ शकणार होती.

१९३५ मध्ये रशेलचे वडिल मरण पावले. कार्सन कुटुंबासाठी तो दु:खद काळ होता, तसंच रशेलच्या आईसाठी जगणं कठीण झालं होतं. आपल्या कुटुंबाला सावरण्यासाठी अधिक चांगली नोकरी मिळवायचं रशेलनं ठरवलं. मग तिनं एल्मर हिगिन्स यांच्याशी परत एकदा जाऊन चर्चा केली. ब्युरो ऑफ फिशरीजमध्ये जीवशास्त्रातल्या संशोधनाची नोकरी उपलब्ध नसल्याचं त्यांनी सांगितलं. मात्र रेडिओवरच्या शैक्षणिक कार्यक्रमांसाठी हिगिन्स यांना पटकथा लिहिण्यात मदत हवी होती. त्या शैक्षणिक कार्यक्रमाचं नाव होतं रोमान्स अंडर द वॉटर्स.



त्या पटकथांमध्ये जडबंबाल वैज्ञानिक शब्द भरपूर वापरलेले असत, जे श्रोत्यांना समजायला जड जात. श्रोत्यांनी मनोरंजनासाठी रेडिओवरचे आपले कार्यक्रम ऐकावेत असं हिगिन्स यांचं मत होतं. त्यातून श्रोत्यांना शिकायला मदत व्हावी असाही त्यांचा हेतू होता. या दृष्टिकोनातून त्यांनी लोकांना समजतील अशा सोप्या गोष्टी लिहायला प्रवृत्त केलं. रशेलनं त्याआधी पटकथा कधीच लिहिल्या नव्हत्या. त्यामुळे हे काम अंगावर घेताना तिला दडपण होतं पण आपलं लेखिका या भूमिकेतलं कौशल्य आणि जलचरांच्या जगाची माहिती याबद्दल तिला खात्री होती. आपल्याला काय करायला हवं याची तिला जाण होती.

जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठ

जॉन्स हॉपकिन्स विद्यापीठ या बाल्टिमोर, मेरीलँडमधल्या विद्यापीठाला रेल्वेमार्ग उभारणीतून करोडो डॉलर्स उभे करणा-या व्यावसायिकावरुन दिलं होतं. तो व्यावसायिक १८७३ मरण पावला, तेव्हा त्यानं ७ मिलियन डॉलर्स विद्यापीठ आणि इस्पितळ उभारण्यासाठी मागे ठेवले होते. अमेरिकेच्या तोपर्यंतच्या इतिहासात ही सर्वात मोठी देणगीची रक्कम होती. २२ जानेवारी १८७६ रोजी विद्यापीठ उभं राहिलं. सुरुवातीला तिथे फक्त पुरुषांना शिकायला परवानगी होती. १८८० पासून स्त्रियांनाही या विद्यापीठात मास्टर्सच्या पदवी शिक्षण घेता यायला लागलं.






मात्र त्यानंतर सुमारे शंभर वर्षं उलटून जाईपर्यंत, म्हणजे १९७० पर्यंत स्त्रियांना तिथे पदवी शिक्षण घेता येत नव्हतं. जॉन हॉपकिन्स ही आजही जगातल्या उत्तम संशोधन संस्थांपैकी एक मानलं जातं.


प्रकरण ५

प्रयत्न सोडू नका..!

रशेलसाठी ते काम योग्य होतं आणि दर आठवड्याचं प्रक्षेपण यशस्वी व्हायला लागलं.



तिनं हे काम सुरु केल्यावर, काही दिवसांमध्येच हिगिन्स यांनी मासे या संदर्भातल्या एका पुस्तिकेची ओळख लिहायला तिला आवडेल का? असा प्रस्ताव रशेलसमोर मांडला. रशेलनं त्या संधीवर झडपच घातली. तिनं रात्रभर जागून ती ओळख लिहिण्याचं काम पूर्ण केलं. तिला ते लेखन परिपूर्ण व्हायला हवं होतं.



रशेलनं वर्ल्ड ऑफ वॉटर्सची ती ओळख दुस-या दिवशी हिगिन्स यांना दाखवली. त्यावर त्यांनी फक्त मान डोलावली.
रशेलला आश्चर्यच वाटलं.
आपलं काय चुकलं असेल?
त्यावर रशेलच्या बॉसनं उत्तर दिलं,
ती ओळख खूपच छान झाली आहे, ती सरकारी पुस्तिकेत न छापता तिनं एखाद्या मासिकात प्रकाशित करावी.

रशेलला आपलं काम आवडत असलं तरी कुटुंबाला आर्थिक मदत करण्याइतके पैसे त्यातून मिळत नव्हते. तिनं मग वर्तमानपत्र आणि मासिकांमध्ये लेख लिहून अतिरिक्त पैसे मिळवायला सुरुवात केली. हे सगळं काम म्हणजे रशेलला रिकामा वेळ अजिबात मिळत नव्हता, ती खूप दमतही होती. पण तिला जे काम प्रिय होतं तेच ती करत होती – निसर्गाबद्दल लेखन..!



तिच्या बॉसनं खूप छान असा शेरा दिलेला लेख रशेलनं विकायचा ठरवला. तिनं द वर्ल्ड आॉफ वॉटर्स या लेखावर अजून थोडं काम केलं आणि द अटलांटिक मंथली या नवीन लेखकांना संधी देणा-या महत्वाच्या मासिकाकडे पाठवला.

रशेलनं थोडेफार बदल केले आणि शीर्षक अंडरसी असं दिलं तर ते हा लेख छापायला तयार झाले. तो लेख मासिकात प्रकाशित झाल्यावर रशेलनं हिगिन्स यांना तो लेख दाखवला. परत एकदा हिगिन्स यांनी फक्त मान डोलावली. आता परत काय चुकलं? असा विचार रशेलच्या मनात आलाच. यावेळी हिगिन्स यांच्या मतानुसार तो केवळ मासिकातल्या एका लेखाचा विषय नसून त्याचं संपूर्ण पुस्तक व्हायला हवं होतं.



तो लेख एका मासिकापुरता मर्यादित राहू नये असं वाटणा-यांमध्ये फक्त रशेलचे बॉसच होते असं नव्हे. क्विन्स होवे, हा सायमन अँड शूस्टर पब्लिशिंग कंपनीचा मालक, विलेम व्हॅन लून हा प्रसिध्द निसर्गतज्ञ या दोघांनीही रशेलला पत्रं लिहिली होती. त्यांनी रशेलला या लेखाचं पुस्तक करण्यासाठी प्रवृत्त केलं.

रशेलला परिपूर्णतेचा ध्यास असल्यामुळे आणि ती दिवसभर नोकरी करत असल्यामुळे, हे पुस्तक पूर्ण व्हायला तीन वर्षं लागली.



१९४१ मध्ये अंडर द सीविंड हे पुस्तक प्रकाशित झालं. हे पुस्तक समुद्रात रहाणा-या जलचरांच्या आयुष्याच्या वास्तव पण अद्‌भुत कथांनी भरलेलं होतं. तसंच त्यांची आयुष्यं सगळ्यांशी कशी जोडलेली आहेत तेही त्यातून दिसत होतं. संशोधक नसलेला कोणीही सर्वसामान्य माणसाला कळेल अशी भाषा रशेलनं पुस्तकात वापरली होती. रशेलच्या पुस्तकावर उत्तम प्रतिक्रिया आल्या पण त्याची विक्री मात्र फार झाली नाही. अंडर द सी विंड प्रकाशित झाल्यानंतर महिन्याभरात अमेरिका दुस-या महायुध्दात उतरली.



अचानक देश युध्दात ओढला गेला आणि आपलं आयुष्य बदलणार याची चिंता लोकांना भेडसावू लागली. समुद्र आणि त्यातल्या जीवांचं आयुष्य यावरचं पुस्तक वाचण्यात कोणालाच रस नव्हता.

आपल्या पुस्तकाला नामवंतांच्या चांगल्या प्रतिक्रिया आल्या तरी त्याची फारशी विक्री झाली नाही यानं रशेल नाराज झाली.

“अंडर द सी विंड”चा खप कमी असल्यामुळे ती एका मैत्रिणीला, कधीच पुस्तक लिहू नकोस असंही म्हणाली.

द फिश अँड वाईल्डलाईफ सर्व्हिस (ब्युरो ऑफ फिशरीजचं नवीन नाव) युध्दकाळात खूपच व्यस्त होतं. त्यांनी त्यांचं ऑफिस १९४२ च्या वसंतऋतूत वॉशिंग्टन डीसी हून शिकागोला हलवलं. रशेलला समुद्राच्या संशोधनात समुद्र आणि अन्न यावर काम करायला सांगितलं. युध्दकाळात रेशनिंग असल्यामुळे लोक मांस कमी आणि मासे जास्त प्रमाणात खात होते. समुद्रापासून मिळणारं अन्न या मालिकेद्वारे लोकांना माशांचे वेगवेगळे प्रकार सांगता येणार होते.

१९४३ मध्ये द फिश अँड वाईल्डलाईफ सर्व्हिस वॉशिंग्टनमध्ये परतलं आणि रशेल मेरीलँडमधल्या सिल्व्हर स्प्रिंग या ठिकाणी नवीन घरात रहायला गेली.






रशेलची आई, भाऊ, बहिण आणि भाचेकंपनी असे सर्वजण तिच्यावर अवलंबून होते आणि वेळोवेळी तिच्यासोबर रहात होते. तिला नुकतीच बढती मिळाली असली तरी स्वत:चा आणि इतर कुटुंबियांचा आर्थिक भार उचलणं तिला जड जात होतं. द फिश अँड वाईल्डलाईफ सर्व्हिसमधल्या नोकरीबरोबर मासिकांमध्ये लेख लिहिणं तिनं चालू ठेवलं.


दुसरं महायुध्द आणि रेशनिंग

दुसरं महायुध्द १९३९ ते १९४५ या काळात जागतिक पातळीवर सुरु होतं. युरोप आणि आशियातला चा जवळपास सर्व भाग, यात सुरुवातीपासून ओढला गेला होता. मात्र अमेरिका १९४१ पर्यंत या युध्दात उतरली नव्हती. जपानी लोकांनी हवाईमधला नाविक तळ – पर्ल हार्बर – यावर बॉंबहल्ले केले तेव्हा अमेरिका युध्दात उतरली. धातू, रबर, मांस, लोणी अशा सर्व वस्तूंचा युध्दामुळे तुटवडा सुरु झाला. १९४५ मध्ये यापैकी अनेक गोष्टींवर रेशन लावलं गेलं, म्हणजे कुटुंबाला ती गोष्ट दर आठवड्याला ठरावीक प्रमाणातच खरेदी करता येत होती. अमेरिकन सरकारनं रेशनच्या वस्तू घेण्यासाठी तिकिटं वाटली होती.


UNITED STATES OF AMERICA
OFFICE OF PRICE ADMINISTRATION
RATION COUPON
FOR
FIVE
POINTS
MEAT, FATS, FISH, and CHEESES
5 5 5 5




दुस-या महायुध्दात घडलेल्या अनेक घटनांमुळे रशेलला असंख्य कल्पना सुचल्या. रडारवर महायुध्दाच्या काळात बरंच संशोधन झालं. त्यावरुन वटवाघुळं आणि त्यांच्यातल्या सोनार लहरी ऐकायची क्षमता यावर लेख लिहिण्यासाठी रशेलला प्रोत्साहन मिळालं. या लेखाचं नावद बॅट न्यू इट फर्स्ट असं होतं. रडारबद्दल लोकांना समजेल अशा प्रकारे स्पष्ट शब्दात लिहिलेला तो सर्वात महत्वाचा लेख आहे असं यावर अमेरिकन नाविक दलाच्या कार्यालयाचं मत पडलं. नेहमीप्रमाणेच, सर्वसामान्यांना समजेल अशा भाषेत विज्ञानविषयक लेख लिहिणं हाच रशेलचा हेतू होता.





जपानमधल्या हिरोशिमा आणि नागासाकी या शहरांवर पाडलेल्या अणुबाँबमुळे दुसरं महायुध्द संपलं.




युध्दातून मुक्तता मिळाल्यानं सगळ्यांनीच सुटकेचा श्वास घेतला. आता आयुष्य सुरळीत होऊ शकत होतं. मात्र रशेलसारख्या मोजक्या जाणत्या लोकांना या विनाशकारी बॉबचा पृथ्वी या ग्रहावर किती विदारक परिणाम होऊ शकतो त्याची जाणीव झाली होती.


बाँब तयार करणा-या आणि तयार करण्याचा निर्णय घेणा-या लोकांमुळे पर्यावरणावर आणि प्रत्येक सजीव गोष्टीवर किती परिणाम होणार आहे ते प्रत्येक माणसाला कळायला हवं असं रशेलला वाटत होतं. पृथ्वी वाचवायला हवी होती.

प्रकरण ६

अखेरीस यशप्राप्ती..!

फिश अँड वाईल्डलाईफ सर्व्हिसेसमध्ये काम करणा-या सहका-यांबरोबर रशेलचा बराचसा वेळ जायचा. शर्ली ब्रिग्जबरोबर ती गिर्यारोहण आणि पक्षीनिरीक्षण करायला जायची. त्या पार्टीला सोबत जायच्या आणि रिकामा वेळ एकमेकींसोबत घालवायच्या.






मात्र रशेल नेहमीप्रमाणे चिक्कार काम करत होती. काही वर्षं तिनं अनेक अद्‌भुत अनुभव जमा केले. डीप सी डायव्हिंग करुन शार्क, आॅक्टोपस आणि समुद्राच्या तळातले इतर प्राणी पहाणं हे तिच्या आयुष्यातले परमोच्च आनंदाचे क्षण होते.

"सगळंच वेगळं भासत होतं.." या अनुभवांनंतर एकदा तिनं एका सहका-याला सांगितलं होतं. तिनं फ्लोरिडा एव्हरग्लेडसजवळच्या पाणथळ भागात तिनं मगरी असल्याचा शोध लावला आणि नॉर्थ अटलांटिक समुद्रात एका संशोधन करणा-या बोटीवर खूप वेळ घालवला.

हे सगळे विलक्षण अनुभव आणि शोध तिच्या त्यानंतरच्या पुस्तकात समाविष्ट झाले – द सी अराऊंड अस. हे पुस्तक १९५१ मध्ये प्रकाशित झालं. त्यात रशेलनं समुद्राचा आपल्या सगळ्यांच्या आयुष्यावर कसा परिणाम होतो ते लिहिलं होतं.



रशेलचं हे पुस्तक म्हणजे एक कविताच होती. तरल शब्दांतून मांडलेले विचार मात्र स्पष्ट आणि सखोल होते. रशेलनं त्यात इकॉलॉजीबद्दल लिहिलं होतं. सजीव आणि भोवतालचं वातावरण यांच्यातलं नातं इकॉलॉजी मांडते. बहुसंख्य लोकांनी हा शब्द तेव्हा प्रथमच ऐकला होता. तो किती महत्वाचा आहे हे आपल्या वाचकांना कळावं अशी रशेलची इच्छा होती.

द सी अराऊंड अस हे पुस्तक खूप गाजलं. ते बेस्टसेलर ठरलं आणि रशेलला त्यातून बरेच पैसेही मिळाले. १९५१ च्या ख्रिसमसमध्ये त्या पुस्तकाच्या दरदिवशी चार हजार प्रती विकल्या जात होत्या.

ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसनं छापलेल्या या पुस्तकाला दोन महत्वाची पारितोषिकं मिळाली – १९५२ सालचं नॉनफिक्शन साहित्याचं राष्ट्रीय पारितोषिक आणि निसर्गविषयक लिखाणाचं बरोज मेडलचं पारितोषिक. ते न्यूयॉर्क टाईम्सच्या बेस्टसेलरच्या यादीत शहाऐंशी आठवडे झळकत होतं आणि त्याचे जगातल्या अठ्ठावीस भाषांत अनुवाद झाले.



वाचकांना रशेलचं समुद्रप्रेम आणि तिचं सखोल ज्ञान यांची भुरळ पडली होती. अनेकजणांना तिला भेटायचं होतं, या पुस्तकाबद्दल बोलायचं होतं. पण रशेल कार्सनसाठी ते कठीण होतं. आपल्या आगळ्यावेगळ्या पुस्तकानं मिळवून दिलेल्या कीर्तीबरोबर जुळवून घेणं तिला अवघड जात होतं.

द सी अराऊंड अस च्या भव्य यशानंतर रशेलनं आपलं पहिलं पुस्तक अंडर द सी विंड परत एकदा छापायचं ठरवलं. यावेळी ते पुस्तक खूप विकलं गेलं. रशेल काय म्हणते आहे यात लोकांना आता रस वाटायला लागला होता. तिची दोन पुस्तकं बेस्टसेलर ठरली होती.

तिच्या ब-याचशा चिंता आता संपल्या होत्या. १९५२ मध्ये रशेलनं नोकरी सोडली आणि सर्ववेळ लिखाण सुरु केलं. तिला तिच्या आवडत्या निसर्गाबद्दल भरभरुन लिहायचं होतं.





रशेलनं पुढच्या पुस्तकासाठी काही संकल्पनांवर संशोधन करायचं ठरवलं. अमेरिकेच्या पूर्व किना-यावर ती आणि तिची आई खूप फे-या मारायच्या, तिथले समुद्रकिनारे धुंडाळून नोटस काढायच्या. आपण आपल्या आईबरोबर काही महिन्यात हजारो मैलांचा प्रवास केल्याचं रशेल अभिमानानं सांगायला लागली. त्यांनी फ्लोरिडामधले प्रवाळयुक्त किनारे, नॉर्थ कॅरोलिनामधले वालुकामय किनारे आणि मैनमधले पथरीले किनारे पालथे घातले.




रशेलला या वेगवेगळ्या ठिकाणची झुडपं आणि जलचर यांचं निरीक्षण करायचं होतं. आता ती पूर्णवेळ लिखाण करत असल्यामुळे तिचं पुढचं पुस्तक लवकर लिहून झालं. १९५५ च्या ऑक्टोबरमध्ये द एज ऑफ द सी प्रकाशित झालं. वाचकांना रशेलचं नवीन पुस्तक वाचायची उत्सुकता होती.

ते पुस्तक लगेचच बेस्टसेलर ठरलं. तिच्या इतर पुस्तकांप्रमाणेच तिनं यात समुद्रकिना-यावरच्या प्राण्यांबद्दल काव्यमय भाषेत लिहिलं होतं. त्या सर्व प्राण्यांनी रहात असलेल्या पर्यावरणाशी कसं जुळवून घेतलं होतं ते तिनं पुस्तकात उलगडून दाखवलं होतं.

ते प्राणी प्रवाळयुक्त किना-यावर किंवा वालुकामय किना-यावर किंवा खडकाळ समुद्रावर रहात असले तरी प्राणी आणि झाडंझुडपं त्या वातावरणाचा भाग बनून गेले होते. रशेलनं आपल्या वाचकांना ते पर्यावरणाशीही कसे एकरुप होऊन गेले होते ते समजावून सांगितलं होतं.


तिच्या तिस-या पुस्तकाच्या यशानंतर रशेल जास्तच प्रसिध्द झाली. तिच्या चाहत्यांना तिला भेटायची इच्छा होती. ती ब्युटी पार्लरमध्ये केस कापत असताना तिला ते शोधून काढायचे. एखाद्या रेस्टॉरंटमध्ये शांतपणे जेवत असताना तिला भेटायला यायचे. ती ज्या हॉटेलमध्ये रहात असेल तिथल्या खोलीचं दार भल्या पहाटे ठोठवायचे. आपल्या पुस्तकांचे आणि लेखनाचे इतके चाहते आहेत ही बाब रशेलला सुखावणारी असली तरी लोकांचं आपल्याकडे इतकं लक्ष आहे हे तिला ब-याचदा झेपत नव्हतं.

ती आतमध्ये अजूनही स्प्रिंगडेल, पेनसिल्व्हेनियामधली लाजाळू मुलगीच होती, जिला एकटं जंगलात भटकायला आवडत होतं.



रशेल कार्सनच्या कविता

सुरेख शैलीत आणि काव्यमय शब्दांत आपल्या वाचकांना विज्ञान समजावून सांगणारी लेखिका म्हणून रशेल कार्सन प्रसिध्द होती. विज्ञानातल्या अवघड संकल्पना तिच्या सोप्या भाषेमुळे लोकांना सहज समजायच्या.



बार्नाकल्स या समुद्री जलचराबद्दल तिनं एज ऑफ द सी मध्ये काय लिहिलं आहे ते उदाहरणादाखल पाहू.

बार्नाकल्स त्यांचे जाळीदार पंख दुमडून दुहेरी झडपा बंद करुन घेतात, त्यामुळे समुद्राचा ओलावा शरीरात धरुन रहातो आणि कोरडी हवा बाहेर पडते.



स्टारफिशच्या समुद्राखालच्या
बनस्पतींच्या जंगलातल्या
शिकारीबद्दल ती लिहिते, इकडून
तिकडे सुळकन जाणारा स्टारफिश
भरतीच्या वेळी त्या जंगलात एखादा
कीटक आपल्या काटेरी हातांनी
पकडून ठेवतो, जरा शांतपणे भटकून
मग तो कीटक नळ्यांसारख्या तोंडानं
ओढून घेतो.

प्रकरण ७

लढा चालूच..

द एज ऑफ द सी या पुस्तकासाठी संशोधन करताना, रशेलनं अनेक लेख आणि पुस्तकं वाचली. त्यात तिनं प्रदूषणाचा जगातल्या पर्यावरणावर होणारा परिणाम याबद्दल खूप पुस्तकं वाचली. देशातली शहरं आणि कारखाने कचरा, औद्योगिक कचरा ज्या प्रकारे नद्यांमध्ये आणि समुद्रामध्ये फेकत होती, त्याबद्दल तिला खूप काळजी वाटायला लागली होती.





१९५७ मध्ये रशेलच्या मरियान या बहिणीची मुलगी म्हणजे तिची भाची मार्जोरी न्यूमोनियानं मरण पावली आणि आता रशेल मार्जोरीचा लहान मुलगा रॉजरचीही काळजी घ्यावी लागणार होती, तिच्या एकोणनव्वद वर्षांच्या आईची जबाबदारी तिच्यावर होतीच. रशेलला आपलं कुटुंब प्रिय होतं, पण त्यांची काळजी घेण्यात बरीच उर्जा खर्च व्हायची.

आपल्याला प्रिय असणारा समुद्र हा एक मोठी कचरापेटी होत चालला आहे याचं रशेलला दु:ख होत होतं. कीटकनाशकांमधून तीव्र रसायनं पिकांवर फवारली जातात याबद्दलही तिनं वाचलं. पिकं आणि वनस्पती यांना हानी पोचवणारे कीटक आणि प्राणी यांना मारुन टाकण्याची कशी गरज आहे ते शेतकरी आणि मोठ्या कंपन्या पटवून देत होत्या. पिकांना हानी पोचवणा-यांशी कसं लढायला हवं याबद्दल अमेरिकन सरकारही घोषणाबाजी करत होतं. रशेलला मात्र हे झाडं, प्राणी तसंच ते धान्य खाणारी माणसं यांच्यासाठी किती घातक आहे ते ठाऊक होतं.



रशेलची स्वत:ची तब्येतही फारशी चांगली नसायची. अनेकदा तिला थकवा जाणवायचा आणि काही वर्षांपूर्वी झालेल्या शस्त्रक्रियेमुळे अशक्तपणाही आला होता. मात्र लेखन, वाचन आणि संशोधन यामध्ये काही खंड नव्हता. आपण शोधलेल्या गोष्टी जगासमोर मांडण्यात तिला सर्वात जास्त आनंद होता.

वेळेशी इतकी मारामारी असूनही, रशेल नवीन प्रकल्प शोधत होती. प्रदूषण आणि कीटकनाशकं यांच्याबद्दल तिला जे समजलं होतं ते जगभरातल्या सगळ्यांना कशा प्रकारे समजावून सांगता येईल त्यावर तिचा विचार चालू होता. त्या सुमारास तिला ओल्गा ओवेन्स हकिनगस या मैत्रिणीकडून एक पत्र आलं. ओल्गाला आपल्या अंगणात मृतावस्थेतले रॉबिन पक्षी मोठ्या प्रमाणात दिसत होते. डासांना प्रतिबंध करण्यासाठी मारलेल्या कीटकनाशकामुळे ते पक्षी मरत असावेत असं तिला वाटत होतं. आणि डासांची संख्या तरीही बेसुमार वाढली होती.



जे कीटकनाशक फवारलं होतं त्याचं नाव होतं डीडीटी. रशेल याबद्दल काही करु शकते का? असं ओल्गानं विचारलं होतं. आपण ते करु शकतो याबद्दल रशेलला खात्री होतीच.
१९५३ मध्ये तिनं मैनच्या किनार-यावर जमिनीचा तुकडा घेऊन छोटं घर बांधलं होतं. तिच्या पुस्तकांनी तिला प्रसिध्दी मिळवून दिली होती आणि रशेलला त्यापासून मोकळीक हवीच होती. रशेल आपली आई आणि रॉजर यांच्याबरोबर त्या छोट्या घरात रहायला गेली. दिवसभर ती आणि रॉजर समुद्रकिना-यावर फिरायचे. तिथे ते मॉस आणि फर्न यांचा अभ्यास करत असत.





रशेलला कीटकनाशकं आणि त्यांचा निसर्गावर होणारा परिणाम याबाबत अभ्यास करण्यात जास्त वेळ घालवण्याची इच्छा होती. हा संशोधन प्रकल्प सोपा नाही याची तिला जाणीव होती. तिनं असं करु नये अशी सूचना अनेकजणांनी दिली होती. पण कोणीतरी आवाज उठवण्याची गरज आहे हे तिला कळलं होतं. रशेलनं यावर जितकं संशोधन केलं, तितकं तिला औदासीन्य आलं. प्रदूषण आणि कीटकनाशकं यांच्यामुळे पक्षी, मासे, कीटक आणि इतर प्राण्यांना किती हानी पोचते आहे याचे तिला शोध लागत होते. आणि मनुष्यजातीचं काय? प्रदूषण आणि कीटकनाशकं जर प्राण्यांना आजारी पाडत असतील, तर माणसाला त्यामुळे आजार होणार हे नक्कीच होतं.

रात्री ते एक विजेचा दिवा घेऊन खडकांच्या दरम्यानचे खेकडे, स्टारफिश अशा प्राण्यांचं निरीक्षण करायचे. रशेलला हवी होती तशी शांतता आणि समाधान तिथे सामावलेलं होतं. तिला तिथे असताना पेनसिल्व्हेनियामध्ये लहानपणी ती शेतावर हुंदडायची त्या आठवणी यायच्या. रशेलला तिच्या आईनं जशा निसर्गातल्या अद्‌भुत गोष्टींबद्दल शिकवलं होतं तसं ती रॉजरला शिकवू इच्छित होती.




डीडीटी



डीडीटी, किंवा डायक्लोरो-डायफेनिल-ट्रायक्लोरोइथेलिन, हे दुस-या महायुध्दात उवा आणि रोग पसरवणा-या इतर कीटकांना मारण्यासाठी शोधलं गेलं. महायुध्दानंतर, शास्त्रज्ञांना याचा पर्यावरणावर काय परिणाम होईल याची काळजी असली तरी, अमेरिकन सरकारनं ड्युपाँट या रासायनिक कंपनीला ते रसायन ग्राहकांना आणि व्यावसायिकांना विकायला परवानगी दिली. अमेरिकन सरकार पिकांवरची कीड वाढू नये यासाठी ते वापरत राहिलं. आपल्या पिकाचं नुकसान करणारे उंदीर, घुशी यांना मारायला शेतकरी ते वापरत असतं. अमेरिकन सरकार आणि ड्युपाँट कंपनीनं हे रसायन सुरक्षित असल्याचं जनतेला सांगितलं होतं. मात्र या रसायनावर शास्त्रज्ञ मोठ्या प्रमाणावर संशोधन करत होते. पर्यावरणाच्या बाबतीत भलं होण्यापेक्षा या रसायनानं जास्त हानी पोचते आहे असं त्या संशोधकांना आढळून आलं होतं. हे रसायन विषारी होतं आणि ते माणसं, झाडं आणि प्राणी यांना आजारी बनवत होतं.

रशेल अनेकजणांशी याबाबत बोलली – कीटक आणि प्राणी यांचे तज्ञ, सरकारदप्तरी काम करणा-या तिच्या मित्रमैत्रिणी, आजारावर उपचार पुरवणारे डॉक्टर्स आणि अगदी शिकार करणारे पारधी, मच्छिमार या सगळ्यांशी ती बोलली.
ते धोकादायक होतं आणि रशेलच्या काही मित्रमैत्रिणींना तिची काळजी वाटत होती. रशेलनं जर बडे व्यावसायिक, सरकारी संस्था आणि कीटकानाशकं वापरणारे शेतकरी यांच्याविरोधात आवाज उठवला तर ते तिच्यावर टीका करुन तिच्या लौकिकाला बाधा आणतील अशी त्यांना भीती वाटत होती. मात्र रशेलचे व्यावसायिकांशी कोणतेच संबंध नव्हते आणि आता ती सरकारसाठी कामही करत नव्हती. यामुळे संशोधन जास्त मोकळेपणानं करता येईल असं तिला वाटत होतं. हवा आणि पाणी स्वच्छ ठेवणं हे महत्वाचं आणि अत्यंत गरजेचं आहे, हे तिला लोकांपर्यंत पोचवायचं होतं.
रशेलनं आपलं हे नवीन काम गुप्त ठेवलं. कोणी आपल्याला थांबवू नये अशी तिला खातरजमा करुन घ्यायची होती. आपलं संशोधन परिपूर्ण होईल याची खात्री करुन घेण्यासाठी तिनं ते नेहमीप्रमाणे एकदा नव्हे तर दोनदा तपासून घेतलं.



तिनं आपलं काम अचूक आहे याची खात्री करण्यासाठी शास्त्रज्ञांकडे पाठवलं. आपला प्रकल्प गुप्त ठेवण्याबद्दलही तिनं प्रत्येकाला विनंती केली.

कीटकनाशकं आणि प्रदूषण यांची समस्या रशेलच्या अपेक्षेपेक्षाही विदारक होती. सरकार आपल्याला धोक्यापासून वाचवेल आणि आपण आजारी पडू असं काही करणार नाही असा जनतेला विश्वास होता. मात्र प्रत्यक्षात तसं नव्हतं असं रशेलचं संशोधन सांगत होतं.

प्रकरण ८

सायलेंट स्प्रिंग, कर्कश्श स्प्रिंग

१९५८च्या नोव्हेंबरमध्ये रशेलच्या डीडीटी आणि इतर कीटकनाशकांच्या संशोधनाच्या दरम्यान तिच्या आईला हृदयविकाराचा झटका आला. काही दिवसांतच मारिया कार्सन मृत्यू पावल्या. रशेलला शोक अनावर झाल्यानं तिनं कामच थांबवलं. आईशिवाय तिचं विश्व अधुरं होतं.

भरीस भर म्हणजे रशेलला एकामागून एक व्याधींनी त्रासलं. प्रथम तिला फ्लू झाला, त्यानंतर पोटाचा अल्सर झाला आणि नंतर संधिवातानं ग्रासलं. रशेलला गुडघ्यांमध्येही इन्फेक्शन झालं, त्यामुळे पुढचे कित्येक महिने तिला समुद्रकिनारी पायी चालता येणार नव्हतं. १९६० मध्ये रशेलला अजून एक दुःखद व्याधी जडली. तिला कर्करोग झाला. या सगळ्या आजारपणांमुळे तिचा प्रकल्प पुरा होणार होता का?



पण अर्थातच कामाचं महत्व रशेल जाणून होती. जगाला ते कळावं म्हणून ती लिहित राहिली. तिला अनेकदा खूप वेदना होत असत आणि हॉस्पिटलच्या चकरा चालू असत.




१९६३च्या सुरुवातीला रशेलचं नवीन पुस्तक लिहून पूर्ण झालं. रशेल आणि तिची एजंट मारी रोडेल यांनी द वॉर अगेन्स्ट नेचर किंवा ॲट वॉर वुईथ नेचर अशी पुस्तकाची शीर्षकं होऊ शकतील का? यावर चर्चा केली. पण पुस्तकाचा विषय गंभीर असला तरी ती शीर्षकं रशेलच्या काव्यमय लिखाणासाठी जास्तच कठोर वाटत होती. मारीनं मग द सायलेंट स्प्रिंग हे शीर्षक सुचवलं. रशेलनं या पुस्तकात प्रदूषण पसरवणा-या रसायनांमुळे चिमणीपासून गरुडापर्यंतच्या पक्ष्यांवर कसा परिणाम होतो त्यावर एक प्रकरण लिहिलं होतं. त्या प्रकरणाला सायलेंट स्प्रिंग हे नाव द्यावं असं तिला वाटत होतं. रशेलच्या एजंटला मात्र ते पुस्तकाचं शीर्षक होऊ शकेल असं वाटत होतं. कीटकनाशकं आणि प्रदूषण जर थांबवलं नाही तर जग एक भयावह सन्नाट्याकडे प्रवास करेल असं या शीर्षकामुळे लोकांच्या लक्षात आलं असतं.



मारी रोडेल

विध्वंसाची साखळी




रशेल कार्सननं कीटकनाशकं आणि रसायनं यांच्यामुळे विध्वंसाकडे नेणारी साखळी कशी तयार होते ते समजावून सांगितलं. जेव्हा विषारी कीटकनाशकं आणि रसायनं पिकांवर आणि झाडांवर फवारली जातात तेव्हा ते खाणा-या प्राण्यांच्या शरीरात ती कीटकनाशकं जातात. कशी? तर पक्षी आणि उंदीर पिकांमधले धान्याचे दाणे आणि मृत कीटक खातात. मोठे प्राणी पक्षी आणि उंदीर खातात. अखेरीस मनुष्यप्राणी विषारी पिकांमधून मिळालेलं धान्य आणि पक्ष्यांचं मांस खातो. कीटकनाशकं आणि रसायनं हे कोणत्यातरी मार्गानं प्रत्येक सजीवापर्यंत कोणत्या ना कोणत्या मार्गानं पोचतंच.



रशेलनं पुस्तकासाठी खूप कष्ट केले होते. तिनं क्लिष्ट वैज्ञानिक संकल्पना लोकांना समजाव्यात यासाठी प्रत्येक शब्द वारंवार तपासून लिहिला होता. सायलेंट स्प्रिंग हे पुस्तक पुरं करायला तिला चार वर्षं लागली. पण लोक हे पुस्तक वाचतील का? आणि त्यांना त्यातला धोक्याचा इशारा समजेल का? त्यानुसार बदल घडवून आणायला ते प्रवृत्त होतील का?

मारी रोडेलनं सायलेंट स्प्रिंग रशेलच्या प्रकाशकांकडे पाठवलं. तिनं ते न्यूयॉर्कर मासिकाकडेही पाठवलं.
काही दिवसांनंतर, रशेलचा फोन रात्री वाजला. न्यूयॉर्करचा संपादक, विल्यम शॉननं ते पुस्तक नुकतंच वाचून संपवलं होतं.
वाचून झाल्याबरोबर त्यानं रशेलला फोन केला होता.




विल्यम शॉन

रशेलनं लिहिलेल्या गोष्टींमुळे त्याला धक्काच बसला होता. मोठ्या रासायनिक कंपन्या वनस्तपी, प्राणी आणि माणसं यांना इजा पोचवत होती आणि सरकार त्याला परवानगी कशी देत होतं? विनाशाकडे चाललेला हा प्रवास थांबवता येणार होता, का उशीर झाला होता? त्याचे हे शब्द रशेलच्या कानांना गुंजारवासारखे गोड भासले. अशाच प्रतिक्रियेसाठी ती आसुसलेली होती.

पुस्तक वाचणा-या प्रत्येकाची हीच प्रतिक्रिया उमटावी असं तिला वाटत होतं. पुस्तक प्रकाशित होण्याआधी त्यातले काही भाग आपल्या मासिकात प्रकाशित करु शकतो का? असं श्री शॉन यांनी रशेलला विचारलं. रशेलनं अर्थातच होकार दिला.


रशेलला त्यापूर्वी वाचकांकडून दाद मिळालेली असली तरी आत्ता मिळणारं कौतुक विशेषच होतं. न्यूयॉर्करमध्ये सायलेंट स्प्रिंगमधली काही प्रकरणं छापून यायला सुरुवात झाली आणि लगोलग वाचकांच्या पत्रांचा वर्षाव सुरु झाला. रशेल जे सांगत होती, त्यानं लोकांना धक्काच बसला होता.



काही पत्रांनुसार रशेल काय म्हणते आहे तेच लोकांना कळत नव्हतं. पण बरीचशी पत्रं तिला दुजोरा देणारी होती. न्यूयॉर्क टाईम्स या वर्तमानपत्रातल्या एका लेखानुसार - रशेलनं एक कथा लिहिली होती, ती वाचून हवेचं तापमान कितीही जास्त असलं तरी काहीजणांच्या अंगावर त्यानं शहारे उमटणार हे नक्की. मात्र रशेल आणि न्यूयॉर्कर या दोघांकडेच पत्रं येत होती असं मात्र नव्हे. परिस्थितीची जाणीव झाल्यानं चिडलेल्या वाचकांनी वर्तमानपत्रं, रासायनिक कंपन्या आणि सरकारलाही पत्रं पाढवायला सुरुवात केली.



रासायनिक कंपन्यांचे प्रतिनिधी आणि कृषी विभागातले अधिकारी हे रशेलनं पुस्तकात लिहिलेल्या गोष्टींमुळे नाराज होते. त्यांनी यावर लढा द्यायचा ठरवला. रशेलनं मांडलेल्या गोष्टी वास्तवाला धरुन नाहीत असा प्रचार त्यांनी वर्तमानपत्रांमधल्या लेखातून, रेडिओ आणि टीव्हीवरच्या कार्यक्रमांमधून सुरु केला.



आपलं संशोधन खरं आहे याची रशेलला खात्री होती. आपण लिहिलेलं सत्य असवं यासाठी ती कायमच झटत आली होती. तसंच रशेलला कीटकनाशकांवर संपूर्ण बंदी असावी असंही वाटत नव्हतं.

कीटकनाशकांमुळे पर्यावरणातल्या प्रत्येक सजीव घटकावर परिणाम होतो हे लोकांना समजावं आणि त्यांच्यापर्यंत ते व्यवस्थित पोचावं एवढीच रशेलची इच्छा होती. रशेलला सरकार आणि रासायनिक कंपन्या यांनी विक्री करण्याआधी रसायनांची तपासणी करावी असं म्हणायचं होतं.

प्रकरण ९

शांतता आणि समाधान

पारितोषिकं आणि भाषणाची आमंत्रणं यांचा महापूर आला. रशेलला भाषण करणं आवडत नसलं तरी जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोचायला हवं हे तिला कळत होतं. मग तिनं टीव्ही वर कार्यक्रम करायला होकार दिला. त्यामुळे एकाचवेळी लाखो लोकांना तिचे विचार ऐकता येणार होते, तिला पहाता येणार होतं. १३ एप्रिल १९६३ रोजौ सीबीएस रिपोर्टस या चॅनेलनं द सायलेंट स्प्रिंग ऑफ रशेल कार्सन हा कार्यक्रम प्रक्षेपित केला.



अनेक रासायनिक कंपन्यांनी हा कार्यक्रम प्रक्षेपित करु नये असं बजावलेलं असताना, अनेक जाहिरातदारांनी त्यांच्या चॅनेलला जाहिराती देणं बंद करण्याच्या धमक्या दिलेल्या असतानाही सीबीएसला रशेलचा संदेश लोकांपर्यंत पोचावा असं वाटत होतं. हा कार्यक्रम १० लाखांपेक्षा जास्त लोकांनी पाहिला. कीटकनाशकं आणि प्रदूषण यांच्याबद्दल काहीच माहिती नसलेल्या आणि रशेलचं पुस्तकही न वाचलेल्या असंख्य लोकांपर्यंत तो कार्यक्रम पोचला.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जॉन एफ केनेडी यांनीदेखील रशेलच्या कामाबद्दल वाचलं. तिच्याशी मतभेद असणा-यांबद्दलही त्यांनी ऐकलं. राष्ट्राध्यक्ष केनेडी यांनी काही शास्त्रज्ञांना कोणाची बाजू बरोबर यासाठी एक विशेष अहवाल तयार करायला सांगितला. १५ मे १९६३ रोजी राष्ट्राध्यक्षांनी नेमलेल्या विशेष समितीनं आपला अहवाल सादर केला.



त्या अहवालानुसार रशेलनं मांडलेली तथ्यं वास्तववादी होती. त्या अहवालामुळे कीटकनाशकांमुळे मर्यादित प्रदूषण होईल अशा प्रकारची रसायनं वापरण्याबाबतीत नवीन कायदा संमत झाला. पिकांना हानी पोचवणा-या कीटकांवर नियंत्रण घालायचे दुसरे मार्ग शोधण्याची रशेलची सूचनाही सरकारनं अंमलात आणली.

रशेल दिवसेंदिवस जास्त प्रसिध्द होत होती आणि कर्करोगामुळे अशक्त होत चालली होती. १९६३च्या उन्हाळ्यात रशेलला या सगळ्या प्रकाशझोतापासून दूर जाण्याची तीव्र इच्छा झाली. ती आपल्या मैनच्या घरात मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवायला निघून गेली. समुद्राची गाज ऐकत तिथले जीवजंतू पहात तिला वेळ घालवायचा होता. निसर्गाच्या समृध्दीसाठी आपण का आयुष्य वेचायचं ठरवलं याचं उत्तर तिला समुद्राच्या सान्निध्यात राहून मिळायचं.


रशेल मैनमध्ये निवांतपणे रहायला गेली असली तरी तिला जितक्या लोकांशी संवाद साधता येईल तितक्या लोकांशी ती बोलायची. जगभरातून तिला आमंत्रणं यायची. पण कर्करोग पसरत चालला होता.





एका भाषणाच्या वेळी तर रशेलला थकवा जाणवल्यामुळे तिनं व्हीलचेअरवर बसूनच भाषण केलं.
रशेल मेरीलँडला १९६४ मध्ये परतली. ती थकली असली तरी लोकांपर्यंत आपलं पुस्तक मोठ्या प्रमाणात पोचलं याचा तिला अभिमान वाटत होता. अमेरिकेतले आणि जगभरातले लोक आता प्रदूषण आणि कीटकनाशकं यांच्याबद्दल बोलत होते.

मनुष्यप्राणी जगाच्या करत असलेल्या विनाशाचा वेग मंदावण्यासाठी कायदे संमत होत होते. तिची अनेक वर्षांची मेहनत फळाला आली होती. स्प्रिंगडेलमधल्या एका शांत, लाजाळू मुलीनं जगभरात बदल घडवून आणला होता..!



१४ एप्रिल १९६४ रोजी रशेल कार्सन तिच्या मेरीलँडमधल्या सिल्व्हर स्प्रिंग या ठिकाणी असलेल्या घरात मरण पावली. ती फक्त छप्पन्न वर्षांची होती.

सायलेंट स्प्रिंग प्रकाशित झाल्यापासून आधुनिक जगाच्या इतिहासात त्याचा कायम बोलबाला असतो.
रशेल कार्सननं जिकडे दुर्लक्ष करता येणं शक्यच नव्हतं अशा पर्यावरणाबद्दलच्या गोष्टी जगासमोर आणल्या.

महत्वाचा वारसा

पर्यावरणाबद्दलचे कायदे तयार होण्यातला रशेल कार्सनचा सहभाग अजोड आहे. एकच व्यक्ती पण तिनं अग्रगण्य पर्यावरणावादी म्हणून पुढच्या अनेक पिढ्यांना वरदान ठरेल अशा प्रकारे देश आणि जग बदललं.




•१९६३ ते १९७४ या दरम्यान अमेरिकन काँग्रेसनं अनेक नवीन धोरणं राबवली. ज्यात क्लीन एअर, क्लीन वॉटर आणि सेफ ड्रिंकिंग वॉटरचे कायदे होते.

• १९६९ मध्ये काँग्रेसनं नॅशनल एनव्हायरमेंटल पॉलिसी अ‍ॅक्ट संमत केला, ज्याद्वारे अनेक सरकारी संस्थांच्या रस्ते आणि धरणं बांधणं, जंगलतोड अशा प्रकल्पांवर परिणाम झाला.

•१९७० मध्ये राष्ट्राध्यक्ष निक्सन यांनी एनव्हायरमेंटल प्रोटेक्शन एजन्सी स्थापन केली, पर्यावरणपूरक आणि त्याविषयक सर्व सरकारी प्रकल्प या संस्थेतर्फे राबवले जातात.

•१९७२ मध्ये डीडीटीवर अमेरिकेत बंदी घातली गेली.



रशेल कार्सनच्या आयुष्याची टाईमलाईन

१९०७ २७ मे रोजी पेनसिल्व्हेनिया, स्प्रिंगडेलमध्ये जन्म.

१९१८ सेंट निकोलस मासिकात पहिली कथा प्रकाशित झाली.

१९२५ पेनसिल्व्हेनिया कॉलेज आॉफ वूमेनमध्ये प्रवेश

१९२९ कॉलेजमधून पदवीधर झाल्यानंतर उन्हाळा वूडसहोलस रिसर्च लॅबोरेटरीमध्ये व्यतीत केला.

१९३२ जॉन हॉपकिन्स विद्यापीठातून मास्टर्सची पदवी.

१९३५ वडिलांचा मृत्यू. ब्युरो आॉफ फिशरीजमध्ये कामाला सुरुवात

१९४१ अंडर द सी वर्ल्ड : हे पहिलं पुस्तक प्रकाशित झालं

१९५१ द सी अराऊंड अस : हे दुसरं पुस्तक प्रकाशित झालं.

१९५२ नॅशनल बुक अवॉर्ड फॉर नॉनफिक्शन

१९५५ द एज आॉफ द सी : हे तिसरं पुस्तक प्रकाशित झालं.

१९५७ रॉजर या बहिणीच्या नातवाला त्याच्या आईच्या मृत्यूनंतर दत्तक घेतलं.

१९५८ आईचा मृत्यू

१९६२ सायलेंट स्प्रिंग प्रकाशित झालं

१९६२ सीबीएस रिपोर्टस या टीव्ही चॅनेलवर कार्यक्रम

१९६३ वयाच्या छप्पनाव्या वर्षी मृत्यू

जगाची टाईमलाईन

१९१४ पहिल्या महायुध्दाची सुरुवात
१९१८ पहिलं महायुध्द संपलं; इन्फ्लुएंझाच्या साथीत २० ते ४० लाख लोकांच्या जगभरात मृत्यू
१९२० स्त्रियांना मतदानाचा हक्क प्राप्त झाला.
१९२८ पेनिसिलिनचा शोध
१९२९ अमेरिकेचा शेअर बाजार कोसळून आर्थिक मंदीची सुरुवात
१९३२ अणुचं विभाजन करण्यात शास्त्रज्ञांना यश
१९३७ जे आर आर टॉल्कीन याची द हॉबिट प्रकाशित
१९३९ दुस-या महायुध्दाची सुरुवात
१९४५ अमेरिकेनं जपानच्या हिरोशिमा आणि नागासाकीवर अणुबाँब टाकला. दुसरं महायुध्द समाप्त
१९४७ ॲन फ्रँकचं द डायरी आॅफ अ यंग गर्ल प्रकाशित
१९५२ ड्वाईट आयसेनहॉवर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष झाले. शार्लोटस वेब हे इ बी व्हाईट यांचं पुस्तक प्रकाशित
१९५५ पोलिओची लस शोधली गेली
१९६० जॉन एफ केनेडी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष
१९७२ डीडीटीच्या वापरावर निर्बंध